म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा० वा०
ग्रं. क्र. १७२२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
१७२२

IRBK-0109122
IRBK-0109122

. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा.वा.
. क्र. ९१२२



ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.



# यशोधरे दार उघड

लाडक्या
बाहुलीस—

चौथ्या
वाढदिवसाची
भेट...


म. ग्रं. सं. ठाणे, शाखा
वा. क्र. ८१२२ नों दि ..........
वि. .......... क्र. ..........




# एक होता राजा

त्याला होत्या आठ मुली. सगळ्यांत लहान जी होती तिचं नांव होतं यशोधरा. एकदा काय झालं, त्या राजाचा वाढदिवस आला. इतर राजांसारखं आपल्या प्रजेकडून आणि सरदारांकडून वाढदिवसाच्या दिवशीं नजराणे घेणं त्याला बिलकूल आवडत नसे. उलट आपल्याच खजिन्यांतल्या बहुमोल वस्तु तो आपल्या आवडत्या माणसांना भेट म्हणून देई. गमतीनें कधीं कधीं तो म्हणायचा, “ काय दुर्दैव पाहा. वर्षातून एकदाच हा वाढदिवस येतो. तो दररोज येता तर रोज कुणाला कांहीं ना कांहींतरी भेटीदाखल देतां आलं असतं. ” असं म्हणून त्यानं ह्यापूर्वीं









झालेल्या वाढदिवसांच्या वेळीं कधीं कुणाला आपले राजमुकुट देऊन टाकले होते, तर कधीं रत्नखचित मुठींच्या तरवारी बहाल केल्या होत्या. त्याच्या लग्नांत अहेर आलेल्या वस्तू सुद्धा त्यानं अशाच भेट म्हणून देऊन टाकल्या होत्या. आतां वाढदिवसाची भेट द्यायला म्हणून नावीन्यपूर्ण असं कांहीं त्याच्याजवळ उरलं नव्हतं आणि त्याच काळजींत तो पडला होता. शेवटीं त्याला एक मजेदार कल्पना सुचली. त्यानं वाढदिवसाच्या सकाळीं, आपल्या आठही मुलींना जवळ बोलावून घेतलं आणि प्रत्येकीला रत्नखचित पिंजऱ्यांत बंद केलेला एकेक हिरवागार पोपट भेट म्हणून दिला. मुलींना पोपट म्हणजे एक मोठी करमणूकच झाली. रात्रंदिवस आपापल्या पोपटांना निरनिराळे बोल शिकविण्यांत त्यांचा वेळ जाऊं लागला.







एके दिवशीं, सकाळीं झोंपेंतून उठल्याबरोबर सगळ्यांत लहान राजकन्या यशोधरा सज्जांत टांगलेला






IRBK-0109122



आपला पोपट आज अगदीं गप्प कां, म्हणून त्याच्या नांवानें हाका मारीत सज्जांत आली आणि पिंजऱ्याकडे लक्ष जातांच तिला एकाएकीं रडं कोसळलं. तिचा लाडका राघू पिंजऱ्यांतच गतप्राण होऊन निश्चेष्ट पडला होता. तिच्या डोळ्यांतून घळघळां आसवें वाहात होतीं. तिच्या हमसाहमशीं रडण्याचा आवाज ऐकून राजवाड्यांतलि दासदासी तिथं सज्जांत गोळा झाल्या. यशोधरेचं सांत्वन कसं करावं हेंच त्यांना समजेना. त्यांनीं ती गोष्ट महाराणीच्या कानांवर घातली. राणीला देखील तिची समजूत काढतां येणं कठीण झालं. शेवटीं ती चिडून म्हणाली देखील, " एवढासा भिकारडा पोपट तो काय नि त्याच्यासाठीं तुझं रडणं तें किती!" असं म्हणत ती तिथून निघून गेली. पण राजकन्येचं रडणं कांहीं थांबेना. राणी निघून गेलेली पाहून राजकन्येला तशीच रडत टाकून दासींनींही शेवटीं काढता पाय घेतला. रडून रडून यशोधरेचे डोळे सुजून लाल झाले. तिचे ओठ सुकले. घशाला



कोरड पडली. रडण्याच्या श्रमांनीं थकून तिला ग्लानि आल्यासारखं झालं आणि तशा स्थितींतच तिला झोप लागली. झोपेंतही ती मधूनमधून हुंदके देतच होती. ती जेव्हां जागी झाली तेव्हां आपल्या पलंगाच्या कठड्यावर एक सुंदर चिमुकला पक्षी किलबिल किलबिल आवाज करून मोठ्या सुस्वर स्वरांत गात असल्याचं तिच्या दृष्टीस पडलं. त्याचं गाणं थांबलं तसा यशोधरेला स्वतःच्या दुःखाचा, रडण्याचा आणि भुकेचाही विसर पडल्यासारखा झाला. त्याच्या निळ्या मखमली पंखांवरून आपले चिमुकले हात फिरवीत ती म्हणाली, "किती गोड गातोस रे तूं." तिच्या बोलण्यानं पक्ष्यालाही मोठा आनंद झाल्यासारखं दिसलं. त्यानं मोठ्या ऐटींत आपला पिसारा फुलवला आणि चोंच वाकडी करून राजकन्येकडे पाहात पलंगाच्या कठड्यावरच नाचाचीं पावलं टाकावीं त्याप्रमाणं मोठी मजेदार हालचाल केली. आपल्या मंजुळ आवाजांत तो तिला म्हणाला, "यशोधरे, तुझा पोपट तर आतां गेलाच. त्याच्याऐवजीं



मला पाळशील तूं ? मी कांहीं पोपटासारखा दिसायला सुरेख नाहीं. पण मला खूप गोड गोड गाणीं येतात." त्याच्या त्या बोलण्यामुळं यशोधरेला इतका कांहीं आनंद झाला, कीं ती बिछान्यांतल्या बिछान्यांत तट्कन् उठून बसली आणि हर्षातिशयानं देहभान विसरल्यागत टाळ्या पिटूं लागली.

दुसऱ्या दिवशीं ती जागी झाली तेव्हांही तो चिमुकला पक्षी गातच होता. तिच्या दासींनीं न्याहारीसाठीं फळं आणि मिठाई आणली. यशोधरेनं आपल्या हातानं प्रथम त्याला भरवलं. तिनं एका बशींत पाणी ओतलं, तिच्यांत त्या चिमुकल्या पक्ष्यानं आंघोळ केली आणि



तेंच पाणी तो पिऊं लागला. तें पाहून यशोधरेच्या दासी म्हणाल्या, "ही काय बाई विचित्र रीत ! ज्या पाण्यांत आंघोळ केली तेंच पाणी प्यायचं !" "कलावंतांचं हें असंच असतं. ते आपल्याच नादांत तल्लीन असतात. तेव्हां त्यांना ह्या साध्या गोष्टीकडे लक्ष द्यायला कुठची सवड !" यशोधरा

म्हणाली. आतां तिची न्याहारी आटोपली होती. पाखरानं मंजुळ आवाजांत परत गायला सुरुवात केली. त्याचं तें गाणं ऐकून तिथं जमलेल्या दासी आश्चर्यानं अगदीं थक्क झाल्या. “ इतकं गोड गाणं आपण कांहीं कधीं ऐकलं नव्हतं. ” असं त्या एकमेकींत कुजबुजत होत्या. तें ऐकून यशोधरेला खूप आनंद तर झालाच, पण इतका सुंदर पक्षी आपल्याला लाभला ह्या जाणीवेच्या अभिमानानं तिचं अंतःकरण भरून आलं. “ चल आतां आपण माझ्या बहिणींकडे जाऊं. तुला पाहून त्यांना खूप मजा वाटेल. ” यशोधरा म्हणाली आणि तिनं आपलं अंगठ्याजवळच बोट त्याच्यासमोर धरलं. झाडाच्या एखाद्या चिमुकल्या डहाळीवर अलगद येऊन बसावं त्याप्रमाणं तें पाखरूं यशोधरेच्या बोटावर येऊन बसलं. पुढं यशोधरा आणि पाठीमागून दासी अशी राजवाड्याच्या ह्या दालनांतून त्या दालनांत, आपल्या एकेका बहिणीला तो पक्षी दाखवीत भटकत होती. यशोधरेला एकूण



सात बहिणी होत्या. प्रत्येक बहिणीपुढं त्यानं नवं गाणं म्हणून दाखविलं. सगळ्या बहिणींची भेट घेऊन झाल्यावर यशोधरा राजाराणीकडे गेली आणि त्यांनींही तिच्या पाखराचं खूप कौतुक केलं. राणी म्हणाली, " उगीच नाहीं मीं तुला उपाशीपोटीं झोपवलं; तूं तशी झोपीं गेलीस म्हणून तर देवानं असा सुरेख पक्षी तुझ्याकडे पाठविला. " " मीं तुला बक्षीस दिलेल्या पोपटापेक्षां हें पाखरूं कितीतरी छान आहे. " राजा म्हणाला. " नाहींतरी त्या पोपटाच्या 'विठ्ठल विठ्ठल' नं अगदीं डोकं उठायची वेळ आणली होती. " राणी म्हणाली.

राजाराणींनीं यशोधरेचं केलेलं तें कौतुक पाहून तिच्या सगळ्या बहिणींचा मनांतून अगदीं जळफळाट झाला. यशोधरेला आतां अस्मान ठेंगणं झालं होतं. ती दिवसभर राजवाड्याच्या ह्या दालनांतून त्या दालनांत एखाद्या मैनेप्रमाणें भटकत राही नि तिचं तें चंडोल वृत्तीचं लहान पाखरूं कोकिळेसारख्या मंजुळ किलबिलाटानं दशदिशा भरून टाकी. दिवस असेच जात होते. यशोधरेचा हा आनंद तिच्या सातही बहिणींच्या मनांत नुसता सलत होता. मत्सरानं त्यांचीं डोकीं अगदीं फिरून गेलीं. शेवटीं त्या

सगळ्यांनीं मिळून एक युक्ति केली. एक दिवस त्या सर्वजणी यशोधरेच्या भोंवतीं गोळा झाल्या आणि मोठा साळसूदपणाचा आव आणून म्हणाल्या, "यशोधरे, तुझा पोपट मेला तेव्हांपासून तुला मोठं चुकल्याचुकल्यासारखं वाटत असेल नाहीं? नि त्यांत वावगं तें काय आहे? पण असं दुःख करून कसं चालेल? तुझ्याजवळ पोपट नाहीं म्हणून आम्हांला खूप वाईट वाटतं. आम्ही आतां काय करणार आहोंत, माहीत आहे? आम्ही आमच्या खाऊच्या पैशांतून एक पंचरंगी पोपट आणणार आहोंत तुझ्यासाठीं."

"कशाला उगीच त्रास घेतां. माझं पाखरूं कितीतरी छान आहे. कशीं गोड गोड गाणीं म्हणतं. मग निष्कारण कशाला हवा आतां पंचरंगी पोपट?" यशोधरा म्हणाली.


तिचं तें बोलणं ऐकून तिच्या सगळ्या बहिणींनीं एकजात नाकं मुरडलीं आणि तुच्छतेनं, नाकांतून त्यांनीं शिंक आल्यासारखा आवाज काढला. "कां, शिंकाशा येताहेत? सर्दी, पडसं झालंयू कीं काय?" यशोधरा म्हणाली.

“ तसं नाहीं ग. पण, आम्हांला बाई मोठं नवल वाटतं तुझं. तूं असं मोकळं वाऱ्यावर सोडलंयस् तुझ्या पाखराला. त्याला ना घर ना बंध. ” कुत्सितपणानं कपाळाला आठ्या घालीत आणि खवचटपणानं बघत तिच्या बहिणी तिला म्हणाल्या.

“ असं काय पाहातां ? तिरळे होतील ना डोळे एखादे वेळीं ” यशोधरा म्हणाली.

“ नाहीं, हेंच पाहात होतों, कीं तुझं तें लाडकं पाखरूं आतां उनाडायला गेलंय् तरी कुठं ? ”

“ उनाडायला कां म्हणून जाईल ? त्याच्या सासऱ्याला भेटायला गेलंय् तें, समजलं ? ” यशोधरा ठसक्यांत म्हणाली.



"आणि आतां तें परत येईल असं वाटतं तुला?" तिच्या बहिणींनीं तिला विचारलं.

"येईलच मुळीं. नेहमींच तें परत येतं." यशोधरा म्हणाली.

"बाई ग," तिच्या सातही बहिणी एकदम म्हणाल्या, "तो तुझा शहाणपणा जरा बाजूला ठेव. आमचं जर तुला ऐकायचंच असेल तर आम्हीं सांगतों तसं कर. कर्मधर्मसंयोगानं जर तो पक्षी परत आलाच तर त्याला सरळ पिंजऱ्यामध्यें अडकवून टाक. उगीच भलता धोका कशाला पतकरतेस?"

"मला नाहीं त्याला कोंडलेलं आवडणार. त्याला कोंडलं तर तो मोकळेपणानं खेळणार कसा?" यशोधरेनं विचारलं.

"तूं तुझं तें आपलं पाहून घे. आम्हांला त्याच्याशीं काय करायचंय्?" त्या साऱ्या बहिणी असं म्हणत मोठ्या कुऱ्यांत तेथून निघून गेल्या.

यशोधरेचं मन एकाएकीं अस्वस्थ झालं. तिला असं वाटलं, कीं तो चिमुकला पक्षी जाऊन जणूं काय अनंत काळ लोटला आहे आणि तरीही तो अजून परत येत नाहीं ह्याचा अर्थ काय? कदाचित् तो संकटांत सापडला असेल असंही तिला वाटलं. बाहिरी

ससाण्याची झडप किंवा फांसेपारध्याचं जाळं, ह्यांत तर तो सापडला नाहीं ना? आणि त्याहीपेक्षां सर्वांत मोठी चिंता तिला वाटली ती ह्याचीच, कीं न जाणों आपल्याच रंगांत दंग झालेला हा पक्षी आपणांस अजिबात विसरून तर जाणार नाहीं ना? किंवा दुसऱ्या कुणाच्या आमिषाला भुलून आपणांस सोडून तर जाणार नाहीं ना? हें असं कांहीं झालं असतं तर यशोधरेच्या दुःखाला पारावार नव्हता. आपला पक्षी कधीं एकदा सुखरूप येतो असं तिला होऊन गेलं आणि आतां तो परत आला कीं, रिकाम्या पडलेल्या सोन्याच्या पिंजऱ्यांत त्याला अगदीं बंद करून टाकलं पाहिजे, असंही तिनं स्वतःला अनेक वेळां बजावलं.

तिची विचारमालिका तिथंच तुटली.

"चिव चिव....टिव टिव" ही परिचित किलबिल तिच्या कानांवर एकाएकीं आली आणि त्यामागोमागच तिच्या खांद्याला कशाचा तरी स्पर्श झाला म्हणून तिनें वळून पाहिलं. कोण हायसं वाटलं तिला! तिचा लाडका पक्षीच मोठ्या ऐटींत तिच्या खांद्यावर बसला होता.



"इतका वेळ काय करीत होतास रे तूं ? काळजीनें माझा जीव इकडे नुसता उडून गेला होता." यशोधरा किंचित् रागानें म्हणाली.

"मला वाटलंच;" पक्षी म्हणाला, "त्याचं असं झालं, कीं माझ्या सासऱ्याकडे होती मेजवानी. मला तो येऊंच देईना. पण तूं उगीचच कांहींतरी तर्ककुतर्क करीत बसशील म्हणून कशीबशी काढली त्याची समजूत नि आलों निघून."

त्याच्या उत्तरानें यशोधरेच्या साऱ्या शंका विरल्या. तरी सुद्धा आतां त्याला असं वाऱ्यावर मोकळं सोडण्यास तिचं मन धजेना. तिनें त्याला आपल्या खांद्यावरून उचललं आणि त्याच्या पंखांवरून हात फिरवीत त्याला हलकेच पिंजऱ्यांत सोडून दिलं नि पिंजऱ्याचं दार बंद केलं. काय बोलावं हेंच क्षणभर त्याला सुचेना. तो अगदीं गोंधळून गेल्यासारखा झाला. त्यानें मन सावरलं आणि पिंजऱ्यांत लावलेल्या हस्तिदंती दांडीवर उडी घेत तो यशोधरेस म्हणाला, "ही कसली जीवघेणी थट्टा तुझी ?" "कोण म्हणतं मी थट्टा करतें आहें ? अरे, आईचीं तीं मोठीं थोरलीं काळीं काळीं मांजरं आहेत ना, तीं इकडे तिकडे भटकताहेत. त्यांची जर का तुझ्यावर



नजर पडली तर.... नको ग बाई .... ती कल्पना ...." यशोधरा त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत होती. "आजची रात्र तर काढ, मग उद्यां करूं आपण त्या काळ्या मांजरांचा बंदोबस्त."

"खरं सांगतेस ? पाहा हं ?.... सकाळीं मला मोकळं सोडलं पाहिजे. मला हें कोंडून घेणं बिलकुल आवडत नाहीं." फुरंगटून तें पाखरूं म्हणालं.

यशोधरेनें त्याच्यापुढें डाळिंबाचे दाणे टाकले. ते खातां खातां त्यानें गायला सुरुवात केली आणि एकदम मध्येंच गायचं थांबला तो नि स्वतःशींच पुटपुटला, "आज हें असं काय होतंय कुणास ठाऊक. बिलकुल गावंसंच वाटत नाहीं."

"बरं वाटत नसेल तर स्वस्थ झोप घे." कांहीं तरीं बोलायचं म्हणून यशोधरा म्हणाली आणि तिनंही आळसटून जांभई दिली नि



क्षणभरांत ती गाढ निद्रेच्या आधीन झाली. कोंबडा आरवतो न आरवतो तोंच तिच्या पाखरानं आरडाओरड करायला सुरुवात केली. "यशोधरे ऊठ, चल, हें पिंजऱ्याचं दार उघड. हिरवळ दंवानं चिंब भिजली आहे तोंच मला जरा फेरफटका मारून येऊं दे."

"ओरडायला काय झालं? आहेस तिथं काय वाईट दिसतोस? चांगला सोन्याचा पिंजरा ...."

"दार उघड – दार उघड." तिचं बोलणं मनावर न घेतां त्यानं अधिकच आरडाओरड करावयास सुरुवात केली.

"ओरडतोस कशाला? चांगलं सुखानं खावं, प्यावं, मजा करावी आणि मनसोक्त गावं." यशोधरा म्हणत होती. पण त्याचं आपलं एकच, "यशोधरे, दार उघड – दार उघड." यशोधरा दार उघडण्याचं चिन्ह दिसेना, तसं त्यानं पिंजऱ्याच्या गजांत अंग घुसविण्याचा प्रयत्न केला. चिडून गजांवर चोंच आपटून पाहिली,

पण व्यर्थ. ही आरडाओरड ऐकून यशोधरेच्या सातही बहिणी तिथं गोळा झाल्या. "शाबास, आतां कसा शहाणपणा सुचला!" एकजण म्हणाली.

"ओरडूं दे. ओरडेल ओरडेल नि गप्प बसेल. आपण स्वतंत्र होतों, मोकळे होतों, हें सुद्धा सवयीनं तो साफ विसरून जाईल." दुसरी एक म्हणाली.

तो चिमुकला पक्षी आपला त्यांची बडबड ऐकतच होता आणि त्या तेथून निघून गेल्या तशी त्यानं पुन्हा गिल्ला करायला सुरुवात केली. "यशोधरे, दार उघड. उघडतेस ना?"

"काय रे छळतोस एखाद्या ह्याच्यासारखा. अरे, तूं इथून उडून जाऊं नये म्हणून मीं तुला पिंजऱ्यांत ठेवलंय्. तूं म्हणजे माझा जीव कीं प्राण. तुला त्रास व्हावा असं मला कधीं तरी वाटेल का? हं, म्हण पाहूं एखादं छानसं गाणं. शहाणा ना तूं.... गाणं म्हटलंस, कीं पेरू देईन हं तुला." पाखरानं कांहींच उत्तर दिलं नाहीं. अगदीं चुपचाप.




तोंडांतून ब्र सुद्धा न काढतां पिंजऱ्यांतच एका कोपऱ्यांत तें जाऊन बसलं. सबंध दिवसांत त्यानं हूं का चूं केलं नाहीं. मग मंजुळ मंजुळ गाण्यांची गोष्टच कशाला !

" उगीच डोक्यांत राख घालण्यांत काय अर्थ बरं ? चांगलं गावं, नाचावं. बरं वाटेल त्यानं तुझं तुलाच ! " यशोधरा म्हणत होती.

" कसं गाऊं ? गर्द झाडी — नितळ पाण्यानं तुडुंब भरलेलीं तळीं, भाताचीं हिरवीं लुसलुसीत शेतं हीं सारीं नजरेसमोर असल्या-खेरीज मला कसं गातां येईल ? " तो खिन्नपणें उत्तरला.

" हात्तिच्या ! एवढंच ना ! चल, मी तुला माझ्याबरोबर बाहेर फिरायला घेऊन जातें. " असं म्हणत तिनं पिंजरा उचलला आणि ती बाहेर बागेंत आली. तिनं पिंजरा वर उंच धरला आणि म्हटलं, " बघ ती गर्द झाडी, तीं तळीं, भाताचीं शेतं .... दिसलीं ? पाहिलींस ? "

' ती झाडी झाडी नाहीं, तीं तळीं तळीं नाहींत नि भाताचीं शेतं भाताच्या शेतांसारखीं दिसत नाहींत. ह्या गजांतून बाहेरचं



जग अगदीं वेगळंच दिसतं. " तो पुटपुटला. तिनं त्याला उचलून राजवाड्यांत आणलं. डाळिंबाचे दाणे त्याच्या पुढच्या वाटींत टाकले. पण तो एका दाण्याला स्पर्श करील तर शपथ. यशोधरा मनांतून अगदीं हबकून गेली. " आतां कसं करायचं ग ? तो तर अन्नाचा एक कण उष्टावत नाहीं. " काकुळतीस येऊन तिनं तिच्या बहिणीस विचारलं.

' खाईल. भूक लागली कीं आपोआप खाईल. उगीच्च घाबरतेस कशाला ? मन चांगलं घट्ट केलं पाहिजे, आपण आपलं. "



" अग, पण त्यानं अजिबातच कांहीं खाल्लं नाहीं तर जिवंत राहील का तो ? " ती कष्टी स्वरांत म्हणाली.

" नशीब त्याचं. त्याला तूं तरी काय करणार ? आपलं बरं-वाईट त्याचं त्याला नको का कळायला ? त्याच्या हट्टीपणाचं प्रायश्चित्त त्याला मिळालं तर त्यांत तुझा काय दोष ? "

"बघूं. उद्यांपर्यंत वाट पाहूं!" ती हताशपणं म्हणाली.

दुसऱ्या दिवशीं पहाटे जाग येतांच यशोधरेनं नेहमींप्रमाणं पाखराला साद घातली. पण तिला उत्तर मिळालं नाहीं. तिनं ताडकन् बिछान्यावरून उडी मारली आणि पाखराचा पिंजरा ठेवला होता तिकडे ती धावली. तिच्यासमोर जें दृश्य होतं तें पाहून तर ती खचूनच गेली. 'आई ग' असा एक आर्त चीत्कार नकळत तिच्या तोंडांतून बाहेर पडला. पिंजऱ्याच्या तळाशीं पंखांत चोंच खुपसून आणि डोळे मिटून तिचा पक्षी अगदीं निपचित पडलेला होता. जणूं वाटावं, कीं आत्तांच ह्याचा प्राण शरीर सोडून निघून गेला आहे. तिनं पिंजऱ्याचं दार उघडलं. आपला हात आंत घालीत त्या चिमुकल्या पाखरास हलकेच बाहेर काढलं आणि ममतेनं त्याच्या पंखांवरून हात फिरवीत, त्याला गोंजारीत तिनं त्याला आपल्या छातीशीं घट्ट घट्ट धरलं. तिच्या डोळ्यांतून नकळत घळघळां अश्रु वाहूं लागले.



अनुक्रम २८५२५
भाग वा·वा 
१०९८
३९/३१५७

"जागा झालास ?.... जागा हो ना....बोल ना माझ्याशीं मी तुझी यशोधरा ना ?" असं म्हणत तिनं आपले ओठ त्याच्या पंखांवर टेकवले. तिच्या अश्रूंनीं त्याचे पंख अगदीं भिजून गेले. पाखरानं हलके हलके आपले डोळे उघडले. समोवार क्षीणपणानं नजर टाकली. आतां त्याच्याभोवतीं स्वातंत्र्याला मर्यादा घालणारे ते पिंजऱ्याचे गज नाहींसे झालेले पाहून त्याला कोण हायसं वाटलं. "मोकळा असल्याखेरीज मला गातांच येत नाहीं. आणि गायलों नाहीं तर मी जगणार तरी कसा ?" कांहीं स्वतःशींच व कांहीं यशोधरेला उद्देशून तो पुटपुटला. राजकन्या यशोधरेला हुंदका अनावर झाला. गद्‌गद् आवाजांत ती त्याला म्हणाली, 'एवढंच ना ?.... जा, तूं मोकळा आहेस, स्वतंत्र आहेस, कुणीही तुला ह्यापुढं बंधनांत ठेवणार नाहीं. माझ्या सुखासाठीं, मीं तुला सोन्याच्या पिंजऱ्यांत ठेवलं. पण मला काय माहीत, कीं त्यानंच तुझं मरण असं जवळ येईल ? कोण स्वार्थी मी ! जा, तूं मोकळा आहेस. ती गर्द झाडी, तीं निर्मळ पाण्यानं भरलेलीं सरोवरं आणि भाताचीं हिरवींगार शेतं तुझी वाट पाहात असतील. तुझ्या सुखाच्या आड येण्याइतकं माझं प्रेम दुबळं नाहीं.'



तिनं असं म्हणत शयनागाराची खिडकी उघडली आणि कठड्यावर त्याला ठेवून दिलं. त्यानं पंख किंचित् फडफडवल्यासारखं केलं.

"तुला यावंसं वाटेल तेव्हां तूं माझ्याकडे ये आणि जावंसं वाटेल तेव्हां निघून जा. तुझा तूं स्वतंत्र आहेस. ह्यापुढं कधींही पिंजऱ्यांत कोंडून ठेवणार नाहीं मी तुला."

"मी परत येईन, यशोधरे. तुझ्याखेरीज मला क्षणभर तरी चैन पडेल का? आणि मी आलों, कीं मला येतात तीं सारीं छान छान गाणीं मी तुला गाऊन दाखवीन." त्यानं पुन्हा पंख फडफडवले. "अरेच्चा, कसे जड झालेत हे पंख".... मग त्यानं पंख पसरले आणि हवेंत तरंगत तरंगत खूप उंच, जिथं फक्त निळं आकाशाच अथांग पसरलेलं दिसतं तिथं तो झेंपावत गेला.

अनुक्रम
विभाग
क्रमांक ९०५६
नों. दि. ३९/३/६९



IRBK-0109122